मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com



विद्युत रोषणाईची चमक दमक.. पुढील महिन्यात येऊ घातलेल्या गणेशोत्सवासाठी गणेश भक्तांची लगबग आतापासूनच दिसू लागली आहे.

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३२५ सातारा रविवार दि.२५ ऑगस्ट २०२४ पाने ४ किंमत ५/- रूपये

# बंदच्या मागून महाराष्ट्रात अघटीत घडवण्याचं कारस्थान

## मुख्यमंत्री शिंदेंचा घणाघात

**यवतमाळ** : बदलापूरमध्ये झालेल्या अत्याचार प्रकरणामुळे राज्याचे राजकारण रंगले आहे. सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. बदलापूर अत्याचार प्रकरणाच्या विरोधात महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी आज रस्त्यांवर उतरुन आंदोलन केले. आपापल्या विविध मतदारसंघामध्ये काळ्या फिती, मास्क बांधून आणि हातात काळे झेंडे घेत उद्धव ठाकरे, शरद पवार व नाना पटोले या प्रमुख नेत्यांसह ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आली. यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निशाणा साधला आहे. बंदच्या मागून महाराष्ट्रात अघटीत घडवण्याचं कारस्थान करत



असल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या आंदोलनावर टीका करताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आज तोंडाला पट्टे बांधून बसले आहेत. लोकशाहीत आंदोलनाला मनाई नाही. पण आंदोलनाच्या नावाखाली समाजाला वेठीस धरता येणार नाही. आम्ही सांगितलं की न्यायालयाने जो निर्णय दिलाय त्याचं पालन सरकार करेल. पण कोर्टाने त्यांच्या विरोधात निकाल दिल्याने त्यांनी कोर्टावर आरोप केले, ताशेरे मारले. तुम्ही कोर्टाला सुप्रीम कोर्टाला बदनाम करता. तुमच्या मनाप्रमाणे निर्णय झाला की व्यवस्था चांगली. निर्णय विरोधात गेला की व्यवस्था वाईट असं तुमचं आहे. वेळीच तुम्ही तोंड उघडलं असतं तर तोंडाला काळी पट्टी बांधण्याची वेळ आली नसती, अशा शब्दांत मुख्यमंत्री शिंदे यांनी टीका केली आहे.

यवतमाळच्या भाषणामध्ये मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, साधूंचं हत्याकांड झालं तेव्हा तोंडावर पट्टी, कोरोनात बॉडीबॅग भ्रष्ट्राचार, खिचडीत भ्रष्टाचारा झाला तेव्हा तोंडावर पट्टी. तेव्हा कंत्राटदाराबरोबर गट्टी होती. चौकात बसून राजकारण करणाऱ्यांना कधीतरी औकात दाखवल्याशिवाय राहणार नाही. भ्रष्टाचारात ज्यांची तोंड काळे झाले त्यांच्या हातात शोभतात काळे झेंडे. आम्ही लोकांना फक्त चांगलं देण्याचं काम केलं आहे. आंदोलन करत असलेले विरोधक वेडे झालेत, पागल झाले आहेत. आपल्या या योजनेमध्ये एवढ्या गतीने कोणी पैसे दिले होते का? विरोधक वारंवार बांगलादेशचं उदाहरण देत आहेत. हा महाराष्ट्र आहे.

बांगलादेशसारखी आरजकता माजवायची आहे का? काय तुमचं म्हणणं आहे. या बंदच्या मागून काहीतरी अघटीत या महाराष्ट्रात घडवण्याचं कारस्थान सुरू आहे असा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

# सौर उर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्राचे एक पाऊल पुढे

## महानिर्मितीकडून राज्यातील साक्री १ हा २५ मेगावॅटचा प्रकल्प कार्यान्वित!

महानिर्मितीने साक्री १ हा २५ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. महानिर्मितीने धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील शिवाजीनगर येथे एकूण ७० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये साक्री-१ (२५ मेगावॅट), साक्री-२ (२५ मेगावॅट) आणि साक्री-३ (२० मेगावॅट) चा समावेश आहे. यापैकी साक्री-१ येथे २५ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मेसर्स गोदरेज आणि बॉयस या विकासकाने इ.पी.सी. (अभियांत्रिकी खरेदी आणि उभारणी तत्वावर) हा प्रकल्प विकसित केला असून क्रिस्टलाईन पद्धतीचे सौर पॅनेल आहेत. या प्रकल्पाची कॅपॅसिटी युटीलायझेशन फॅक्टर (सी.यू.एफ.) २०.५९ टक्के असून वार्षिक वीज निर्मिती ४५.०९ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.

२१ ऑगस्ट रोजी हा सौर प्रकल्प कार्यान्वित करून २२०/३३ के.व्ही. शिवाजीनगर, साक्री उपकेंद्राशी यशस्वीरित्या जोडण्यात आला. साक्री-१ प्रकल्पामुळे ५० लोकांना रोजगार उपलब्ध झाला



आहे. आता महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ४२८ मेगावॅट इतकी झाली आहे.

साक्री-१ प्रकल्पाची वैशिष्ट्ये

या प्रकल्पासाठी ५२ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून याचा प्रकल्प खर्च ९३.१२ कोटी इतका आहे. या प्रकल्पातून उत्पादित वीज ही खुल्या बाजारात विकण्यात येणार आहे.

साक्री येथे महानिर्मितीचा १२५ मेगावॉट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प मागील सुमारे दहा वर्षांपासून कार्यरत आहे. त्यात साक्री-१,२,३ सौर प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकाच ठिकाणी सुमारे १९५ मेगावाट स्थापित क्षमता असलेल्या या सौर प्रकल्पामुळे साक्री महानिर्मितीचे सोलर हब म्हणून नावारूपास येणार आहे.

जुलै २०२४ पासून महानिर्मितीने सेझ बायोटेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे समवेत १५ मेगावॅट सौर वीज वितरणाचा करार केला आहे.

साक्री-१ येथे २५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स गोदरेज एन्ड बोएस कंपनी तर साक्री-२ हा २५ मेगावॉटचा सौर ऊर्जा प्रकल्प टाटा पॉवर सोलर सिस्टिम , साक्री-३, हा २० मेगावॅट स्थापित क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स स्वरयू पॉवर करीत असून लवकरच हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

साक्री-१ येथे २५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.अनबलगन यांनी संचालक(प्रकल्प) अभय हरणे आणि (नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि नियोजन)चमुचे तसेच मेसर्स गोदरेज एन्ड बॉयस च्या अधिकारी, अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे.

# भीषण अपघातात दोन युवक ठार



सातारा : माणचे आमदार जयकुमार गोरे यांच्या ताफ्यातील भरधाव वाहनाने दुचाकीला उडवल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन तरुण जागीच ठार झाले. अनिकेत नितीन मगर (वय २६) व रणजित राजेंद्र मगर (वय ३२, रा. शेरेवाडी, ता. माण) अशी मृत तरुणांची नावे आहेत. हा अपघात शेरेवाडी (ता. माण) येथे शनिवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास झाला.

याबाबत घटनास्थळावरून व पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार माणचे आमदार जयकुमार गोरे यांचा सध्या मतदारसंघात जनसंवाद दौरा सुरू आहे. या दौर्‍यात त्यांच्यासोबत तीन ते चार वाहनांचा ताफा असतो. शनिवारी सकाळी आमदार गोरे हे जनसंवाद दौर्‍यासाठी बोराटवाडी येथील आपल्या निवासस्थानातून बाहेर पडले. ही सर्व वाहने भरधाव वेगात निघाली होती. याच सुमारास बिदाल व दहिवडी दरम्यान असलेल्या शेरेवाडी येथील अनिकेत मगर व रणजित मगर हे स्कुटीवरून बिदालकडे निघाले होते. या दरम्यान शेरेवाडी फाटा येथे स्कार्पिओ चालकाला आपला वेग आणि तोल सावरता न आल्याने अपघात घडला. यात कारने रणजीत आणि अनिकेतला चिरडून सुमारे ५० मीटर अंतरावर लगतच्या घराच्या आवारात जाऊन थांबली.

हा अपघात एवढा भीषण होता की दुचाकीसह दुचाकीस्वार हवेत उडाले. यात दुचाकीचा चक्काचूर झाला तर दोघे दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. यात कारचेही मोठे नुकसान झाले. गंभीर दुचाकीस्वारांना तत्काळ दहिवडीतील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला होता. त्याचबरोबर आमदार गोरे यांच्या ताफ्यातील स्कार्पिओ गाडीचा चालक गंभीर जखमी असल्याचे समजते. या घटनेमुळे बिदाल-शेरेवाडी गावावर शोककळा पसरली आहे. अपघातस्थळी मोठी गर्दी जमली होती. आमदारांच्या ताफ्यातील गाडीने अपघात झाल्याने याची तालुक्यात मोठी चर्चा सुरु होती. रात्री उशिरापर्यंत दहिवडी पोलीस ठाण्यात याबाबतचा गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु होती.



# शरद पवारांवर टीका केल्यावर हेडलाईन होते

## राज ठाकरेंना सुनावले सुप्रिया सुळेंनी खडेबोल

**पुणे** : बदलापूर घटनेच्या निषेधार्थ राज्यभरामध्ये महाविकास आघाडीकडून मूक आंदोलन करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांनी आपापल्या जिल्ह्यामध्ये आंदोलन केली. यावेळी काळ्या फिती व काळे मास्क घालून निषेध व्यक्त करण्यात आला. त्याचबरोबर महायुतीच्या सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. यावेळी शरद पवार गटाने पुण्यामध्ये आंदोलन केले. जेष्ठ नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनासाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी शरद पवार यांनी काळा मास्क लावून बदलापूर घटनेचा निषेध केला. यावेळी शरद पवार यांनी महिलांच्या सुरक्षितेतेची शपथ घेतली. यावरुन राज ठाकरेंनी निशाणा साधला. त्याला आता सुप्रिया सुळेंनी प्रत्युत्तर दिले आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्यामध्ये माध्यमांशी संवाद साधला. यावेळी भाजपकडून देखील बदलापूर घटनेच्या निषेधार्थ व महाविकास आघाडीच्या विरोधात आंदोलनं सुरु आहे. पुणे भाजपने देखील आंदोलन केले. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ही लोकशाही आहे. त्यांनाही आंदोलन करण्याचा हक्क आहे. आम्हाला एक समाधान आहे की, सरकारने आंदोलनकर्त्यांविरोधात आणलेल्या भयानक कायदा आणला होता. आम्हाला समाधान आहे की आमच्या विरोधात का होईना ते आंदोलनाला तरी बसले आहेत. त्यामुळे अशा बाबतीमध्ये अशा वेळी समाजामध्ये चर्चा झाली पाहिजे. याचा निषेध झाला आहे. आमचं सरकार असताना अशा घटना झाल्या आहेत. तेव्हा भाजपने आंदोलनं केली. हा त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे आंदोलनाचा अधिकार लोकशाहीने प्रत्येकाला दिला आहे. सरकारने ऐकून घेण्याची ताकद असली पाहिजे. असे मत सुप्रिया सुळेंनी व्यक्त केले.

तसेच दौंडमध्ये देखील अत्याचाराची दुर्दैवी घटना झाली. त्यामध्ये पुणे ग्रामीण पोलिसांनी आणि दौंड पोलिसांनी अतिशय योग्य व लवकर कारवाई केली. पोलिसांची ही कारवाई चांगली आहे. या घटनेमध्ये अनेक वर्षे अनेक बळी झाले आहेत. आपापसात मिटवण्यामध्ये अनेक वर्षे गेली. आता या घटनेवर जी शिक्षा होईल याने नराधमांवर वचक बसेल असे मत सुप्रिया सुळे यांनी दौंडच्या घटनेबाबत व्यक्त केले.

# स्टील कंपनीत भीषण स्फोट, २० जण गंभीर जखमी

**जालना** : जालन्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये भयंकर स्फोट झाला आहे. या स्फोटाचा आवाज दूरवर आला. भीषण स्फोटानं जालना एमआयडीसी हादरली आहे. जालन्यातील औद्योगिक वसाहतीत स्फोटाचा आवाज आला. मिळालेल्या माहितीनुसार कज केसरी या स्टील कंपनीत दुपारच्या सुमारास बॉयलरचा स्फोट झाला.

या स्फोटात दहा ते बारा जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. तर २० ते २५ जण गंभीर रित्या भाजल्यानं जखमी झाले आहेत. जखमींना तातडीनं जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

या घटनेनंतर पोलिसांनीही घटनास्थळी जात कंपनीची पाहणी केली मात्र अद्याप याबाबत अधिकृत माहिती प्रशासनाच्या वतीनं देण्यात आली नाही. बॉयलरमध्ये स्फोट कसा झाला नेमकं काय कारण होतं हे देखील अद्याप कळू शकलं नाही. २०-२५ मजूर गंभीर जखमी असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# महाराष्ट्रातही शक्ती कायदा लागू व्हावा; प्रताप सरनाईक यांचे राष्ट्रपतींकडे साकडे

**भाईंदर :-** महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. यासंदर्भात विचार करून आंध्र प्रदेश सरकारने त्यांच्या राज्यात नवीन कायदा तयार केला. त्यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ व ३७६अ मध्ये दुरूस्ती केली आहे. त्या नव्या कायद्यांतर्गत महिलांवरील होणारे अत्याचार, आणि सामुहिक अत्याचार अशा आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द झाल्यावर तात्काळ शिक्षा देण्याची तरतूद केली गेली. एखाद्या महिलेवर अत्याचाराची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्यानंतर पोलीसांनी ७ दिवसात तपास पुर्ण करायचा व न्यायालयाने देखील त्याची सुनावणी १४ दिवसात पुर्ण करायची असे त्यात ठरविण्यात आले.

या कायद्यामुळे गुन्हा सिध्द झाल्यास २१ दिवसांच्या आत आरोपीस शिक्षा देऊन सदर प्रकरण निकाली काढावयाचे त्या कायद्यात मंजूर करण्यात आले. महिलांवरील अत्याचारी आरोपीस विहीत



मुदतीत म्हणजे २१ दिवसाच्या आत शिक्षेची कायदेशीर तरतूद करणारे आंध्र प्रदेश हे भारतातील पहिले राज्य त्यावेळी ठरले होते. आंध्र प्रदेश प्रमाणे महाराष्ट्रात देखील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. अशा प्रकारचे गुन्हे करण्याऱ्या गुन्हेगारांना तातडीने शिक्षा होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने देखील आंध्र प्रदेशच्या धर्तीवर नवीन कायदा तात्काळ करण्याची आवश्यकता आहे. म्हणून सदर कायदा महाराष्ट्र राज्यात लागू करण्यासाठी भारतीय दंड संहिता (इंडियन पिनल कोड) च्या कलम ३७६ मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

। विधेयकाचा हेतू होता व सदरहू शक्ती कायदा विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाला असून महामहिम राष्ट्रपतींची अंतिम मंजुरी मिळाल्यावर हा कायदा लागू होऊ शकतो. त्याकरिता राष्ट्रपतींच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. राज्यातील महिला, तरूणीं व बालकांवर होणारे अत्याचार बंद व्हावेत, गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे व असा गुन्हा करण्यास कोणी धजावूच नये इतका कडक कायदा लागू असावा, गुन्हेगारांना वचक बसावा याकरिता आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'शक्ती कायदा विधेयक लागू करावा यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र विधानसभेत मांडले होते व हे विधेयक एकमताने मंजूर ही झाले.

हे शक्ती कायदा विधेयक विधानसभेत २३ डिसेंबर, २०२१ तर विधानपरिषदेत २४ डिसेंबर, २०२१ रोजी सर्वांनुमते मंजूर झाले. या कायद्यात काही सुधारणा करून गुन्हेगाराला थेट फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. विधानपरिषद व विधानसभेची मंजुरी मिळाल्यानंतर त्याचवेळी हे विधेयक महामहिम राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले. परंतू, अद्यापही या शक्ती कायद्याला अंतिम मंजुरी मिळाली नसल्याचे समजते. त्याकरिता महामहिम राष्ट्रपतींची अंतिम संमती मिळणे गरजेचे आहे. लहान बालके, तरूणीं, स्त्रिया यांच्यावर अत्याचार करणार्या नराधमास आरोपाली फाशी देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

यासाठी शक्ती कायदा महाराष्ट्रात तात्काळ लागू होणे आवश्यक आहे. जो कोणी नराधम अत्याचार करेल त्या आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल तसेच ती व्यक्ती द्रव्यदंडासही पात्र राहील असे या शक्ती कायद्यात निश्चित करण्यात आले. लहान मुली, स्त्रियांवर अत्याचाराच्या घटना देशामध्ये वाढत असल्यामुळे लोकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. अशा घटना समाजात घडूच नयेत, गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे यासाठी आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा देणारा हा शक्ती कायदा महाराष्ट्रात तात्काळ लागू व्हावा. अशी मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी राष्ट्रपतीयांच्याकडे केली आहे.



सध्या विविध गणेश मूर्ती विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

# रोज येणाऱ्या अत्याचारांच्या वृत्तांमागे राजकारण की येणाऱ्या निवडणुका?



**नागपुर :** बदलापूर प्रकरण उजेडात आल्यानंतर महाराष्ट्रात सातत्याने महिला आणि चिमुकल्यांवरील अत्याचारांच्या घटना समोर येत आहेत. फक्त लैंगिक शोषणच नव्हे तर त्यानंतर मुलींची हत्याही केली जातेय. या घटनांमध्ये वाढ का झालीय? यामागे कोणतं राजकारण आहे का? असा थेट सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपस्थित केलाय. ते आज नागपुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणी राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी ट्वीट करून सरकारला धारेवर धरलं होतं. आंदोलकांना अटक होऊ शकते, पण आरोपीला अटक करायला वेळ का लागला? असा सवाल विचारत त्यांनी लाडकी बहीण योजनेवरूनही राज्य सरकारला फटकारलं होतं. आता त्यांनी अशा घटना वारंवार समोर का येत आहेत? यावरून संशय व्यक्त केला आहे. हा संशय व्यक्त करताना त्यांनी २०१७ पासून महाराष्ट्रातील महिला अत्याचारांविरोधातील आकडेवारीच पत्रकार परिषदेत मांडली.

दर तासाला एक गंभीर गुन्हा

''ज्यांनी ज्यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली त्यांच्यासाठी आणि आताच्यांसाठीही आहे. महिलांवरील अत्याचारात वाढ होत आहे. मुंबईमध्ये महिला आणि मुलींना सुरक्षित वाटत नाही'', असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात महिलांविरोधातील वाढता आलेख सांगितला. ''बलात्कार, हुंडाबळी, विनयभंग, लैंगिक अत्याचार, अनैतिक व्यापार आणि इतर अत्याचार वाढले आहेत. २०१७ मध्ये ४३२०, २०१८ मध्ये ४९७४, २०१९ मध्ये ५४१२, २०२० मध्ये ४८४६, २०२१ मध्ये ५९५४, २०२२ मध्ये ७०८४ आणि २०२३ मध्ये ७५२१ एवढ्या बलात्कार प्रकरणांची नोंद पोलीस ठाण्यात आहेत. महाराष्ट्रातील या आकडेवारीनुसार दर तासाला एक गंभीर गुन्हा नोंदवला जातो. नोंद न करता आलेले गुन्हे यापेक्षा जास्त असतील. नॅशनल क्राइम ब्युरोच्या अहवालानुसार उत्तर प्रदेशखालोखाल महाराष्ट्रात महिलांविरोधातील गुन्हे समोर आले आहेत'', अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली.

रोजच्या अत्याचारांच्या घटनांमागे राजकारण?

''आता जे रोज प्रकरण येतायत, ते तासाला यायला पाहिजे ना. महाराष्ट्रात प्रत्येक पोलीस ठाण्यात किती गुन्हे दाखल होतायत आणि मला फक्त एवढंच म्हणायचं आहे की इतके दिवस दाखवले जात नव्हते. बदलापूरचं प्रकरण अत्यंत दुर्दैवी. त्यालै ठेचलंच पाहिजे. याचं कारण, आपल्याकडे कठोर शासन, कठोर कायदा होत नाही. निर्भया प्रकरणातील आरोपी कळला, कसा बलात्कार झाला हेही कळलं. पण फाशी किती वर्षांनी झाली? एवढा जर उशीर एका केसला लागत असेल तर त्याचं काय करायचं? प्रश्न असा आहे की ज्यांनी आज बंद पुकारला आहे त्यांच्याही काळात असे अत्याचार घडले होते. आणि आजही आहेत. आता जे रोजच्या रोज वर्तमानपत्रात सुरू आहे, आज इथे अत्याचार, उद्या तिथे अत्याचारष्ठ त्यामागे राजकारण आहे का? येणाऱ्या निवडणुका आहेत का?'' असा संशयही त्यांनी व्यक्त केला.

''आपल्याला विषय संपवायचा आहे. या गोष्टी महाराष्ट्रात होऊ नये, हा विषय आहे. निवडणुका आल्या की सरकारला बदनाम करा, या

# महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एका पुतण्याची बंडखोरी?

## अनिल सावंत पवारांच्या भेटीला



**सोलापूर :** विधानसभा निवडणूक आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे, निवडणुकीचं वारं जोरदार वाहू लागलं आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात महायुतीला मोठा फटका बसला होता. तर दुसरीकडे महाविकास आघाडीनं मात्र जोरदार मुसंडी मारली. आता विधानसभेची तयारी सुरू झाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील कोणत्या घटक पक्षाच्या वाट्याला किती जागा येणार याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच सोलापुरातून मोठी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे अनिल सावंत यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली आहे. या भेटीमुळे चर्चे ला उधाण आलं आहे.

आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे अनिल सावंत यांनी शरद पवार यांची भेट घेतली आहे. भैरवनाथ शुगर लवंगी येथील साखर कारखान्याचे ते चेअरमन आहेत. अनिल सावंत हे पंढरपूर -मंगळवेढा विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक आहेत. त्यांनी -मंगळवेढा विधानसभा मतदारसंघावर दावा देखील केला होता. मात्र सध्या ही जागा भाजपकडे आहे. या मतदारसंघात भाजपचे समाधान औताडे हे आमदार आहेत. भविष्यात देखील ही जागा भाजपच्याच वाट्याला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

अनिल सावंत यांनी शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर चर्चेला उधाण आलं आहे. अनिल सावंत हे आता हाती तुतारी घेऊन पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा लढवण्याची शक्यता आहे. हा मंत्री तानाजी सावंत यांच्यासाठी आणि शिवसेनेसाठी मोठा धक्का असू शकतो.

# स्नेहांकित हेल्पलाईनची अंध शिक्षण परिषद मुंबईत

**मुंबई :** विशेष अंध शाळांकरिता व शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी स्नेहांकित हेल्पलाईन या सामाजिक संस्थेमार्फत मार्फत नवीन शिक्षण पद्धती या विषयावर परिषद आयोजित केली आहे.अशी माहिती मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत संस्थेच्या अध्यक्षा परिमला भट यांनी दिली.

सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शिक्षकांकरिता नवीन शिक्षण पद्धती कशी लागू करता येईल याबाबत चर्चासत्र व सूचना या परिषदेच्या माध्यमातुन शासनास सादर करण्यात येणार आहेत. नेहांकित हेल्पलाईन ही संस्था मागील २३ वर्षांपासून अंध युवकांना शैक्षणिक क्षेत्रात विविध स्तरावर मार्गदर्शन करत आहे. विलेपार्ले पूर्व मुंबई येथे महाराष्ट्रातील विविध अंध शाळांकरिता व शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व शिक्षा




अभियाना अंतर्गत शिक्षकांकरिता परिषद २५ ऑगस्ट रोजी उत्कर्ष मंडळ हॉल, विलेपार्ले पूर्व, मुंबई येथे होत आहे.

माधव गोरे व योगेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन शैक्षणिक धोरण, त्याची ओळख व ते अंधांकरिता कसे राबविता येईल याबाबत एक सत्र आहे. विविध क्षेत्रातील जाणकार व अनुभवी आपले अभ्यासपूर्वक विश्लेषण करणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरण हे सर्वसमावेशी असून यात प्रत्येक टप्प्यावर विविध शाळांमध्ये कशा पद्धतीने कामकाज करावे याबाबत माहिती मिळणार आहे . नवीन धोरण अंधशाळांकरिता देखील शासनाने लागू करावे. तसेच स्नेहांकित हेल्पलाईन या संस्थेमार्फत अभ्यासपूर्वक सर्व शाळांच्या सहमतीने प्रस्ताव या परिषदेत सादर करण्यात येणार आहे.असे डॉ माधव गोरे यांनी सांगितले.

# शुभदा शितोळेंचे निलंबन : मंत्र्यांची ' थाप ' होती काय?

**मुंबई :** बदलापूर येथील शाळकरी मुलींवरील लैंगिक अत्याचारांच्या प्रकरणात स्थानिक महिला वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांनी दाखवलेली संवेदनशून्यता अक्षम्य आहे. त्यावरून खरे तर, सरळ बडतर्फ करून त्यांना घरी बसवण्याची गरज होती. पण शितोळे यांना निलंबित करण्यात आल्याचे एका मंत्र्याने जाहीर केल्यानंतरही त्या पोलीस निरीक्षक महिलेची बदलापूरहून मुंबईला बदली झाल्याच्या बातम्या आज प्रसिद्ध झाल्या आहेत. शितोळे यांना खरोखर निलंबित केलेय की, त्यांची फक्त उचलबांगडी केली आहे?

गृह खात्याने बदलीला कारवाईच्या, शिक्षेच्या प्रकारात कधीपासून समाविष्ट केले आहे? त्यांना निलंबित केल्याची मंत्र्यांनी केलेली घोषणा ही जनक्षोभावर पाणी फिरण्यासाठी केलेली निव्वळ थाप होती काय?



हे एकूणच प्रकरण म्हणजे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह खात्याच्या अनागोंदी आणि निरंकुश कारभारावरचे भाष्य म्हटले पाहिजे.

स्वतः महिला असूनही बदलापूरच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाने दाखवलेला बेदरकारपणा पाहून जुन्नर तालुक्यात २०१९ मध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या बलात्काराचे एक प्रकरण इथे हटकून आठवले आहे. त्या प्रकरणाचे बदलापूर प्रकरणाशी साम्य म्हणजे तेथील पोलीस उप अधीक्षक महिलेनेही टोकाची संवेदनशून्यता दाखवली होती! तिने पोलीस अधीक्षकांनी आदेश देऊनही

तब्बल तीन आठवडे त्या प्रकरणाकडे कानाडोळा केला होता !

मी स्वतः त्या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर तत्कालीन पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल यांनी त्या महिला

' डीवायएसपी ' ला त्या प्रकरणाच्या तपासातून तडकाफडकी हटवण्याची कारवाई केली होती!

तुम्ही पोलीस अधीक्षकांना जाऊन भेटलात ना?, त्यांनी दिले का तुम्हाला पोलीस संरक्षण?

तुमच्या पीडित मुलीला यापुढे खासगी गाडीतून शाळेत नेऊन सोडा किंवा शाळेजवळ घर विकत घेऊन तिकडे राहायला जा!

आरोपीच्या मित्रांची नावे आम्हाला सांगत बसू नका,त्यांना आम्ही गावात बंदी घालायची काय?

असे सवाल पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील त्या पोलीस उप अधीक्षक महिलेने पीडित मुलीच्या पालकांना त्यावेळी केले होते.

स्थानिक पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षकाने तर, महिला पोलीस अधीक्षकांवर कडी केली होती. त्याने तर तत्कालीन पुणे जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतरही घटनास्थळी १८ दिवसांनी भेट दिली होती! अशी दडपादडपी, पीडितांची गळचेपी केवळ फिल्मी पडद्यावर ' दामिनी ' चीच होते अशातला भाग नाही. किंबहुना जे समाजात घडत असते, त्याचेच प्रतिबिंब सिनेमात पडत असते. काहीही तक्रार घेवून गेलेल्या सामान्य माणसावर पोलीस आधी डाफरले नाहीत, असे पोलीस ठाण्यात हल्ली क्वचितच अनुभवायला मिळते.



# काळ्या फिती बांधून महाविकास आघाडीचं मुकनिषेध आंदोलन

**कोल्हापूर** - बदलापूर इथं दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडीच्या वतीनं महाराष्ट्र बंदच आवाहन करण्यात आलं होतं. मात्र, उच्च न्यायालयानं बंद करण्यास मनाई केल्यानं आज महाविकास आघाडीच्या वतीनं कोल्हापुरातील ऐतिहासिक बिंदू चौकात तोंडाला काळ्या फिती बांधून सरकारच्या विरोधात मुक आंदोलन करण्यात आले

महाविकास आघाडीच्या वतीनं पुकारण्यात आलेल्या बंदच्या विरोधात ॲड. गुणवंत सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर तातडीची सुनावणी करताना उच्च न्यायालयानं, राजकीय पक्षांना अशा प्रकारचा बंद करता येणार नाहीं असं सांगितल्यानं काल रात्री उशिरा महाविकास आघाडीच्या वतीनं आज पुकारण्यात आलेला बंद माघार घेण्यात आला. मात्र, महाविकास आघाडीतील घटक पक्षाच्या वतीनं संपूर्ण राज्यभरात ठीक ठिकाणी तोंडाला काळ्या फिती बांधून राज्य सरकार विरोधात मुकनिषेध आंदोलन करण्यात येणार असल्याचं सांगितलं होतं. या पार्श्वभूमीवर आज कोल्हापुरात बिंदू चौक इथं महाविकास आघाडीच्या वतीनं तोंडाला काळ्या फिती बांधून आणि काळे ध्वज हातात घेवून मुकनिषेध आंदोलन करण्यात आलं.

यावेळी खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते संजय पवार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष व्ही बी पाटील, आ.ऋतुराज पाटील, आ. जयश्री जाधव, आ. जयंत आसगावकर, आ. राजूबाबा आवळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल पाटील, आपचे जिल्हाध्यक्ष संदीप देसाई, प्रा. उदय नारकर,शेकापचे बाबुराव कदम, कॉम्रेड सतीशचंद्र कांबळे यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

# रुग्णांच्या मदतीसाठी दहीहंडी बक्षीसाची रक्कम

**मुंबई :** दहीहंडी उत्सव एक इव्हेंट झाला आहे. लाखो रुपये खर्च होत आहेत. मात्र हे लाखो रुपये गोरगरीब रुग्णांच्या उपयोगी आले तर ? हा विचार घेऊन दहीहंडी कार्यक्रमाचे अडीच लाख रुपये गोरगरीब रुग्णांच्या उपयोगी आणण्यात येणार आहेत.

समाजसेवक तसेच धगधगती मुंबईचे संपादक भिमराव धुळप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपविभागप्रमुख यशवंत विचले यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातील दहीहंडीच्या पथकाची संख्या १०० वरून २५ करत शिल्लक ७५ पथकाची बक्षीस रक्कम गरीब रुग्णांना देण्यात येणार आहे.

अडीच लाख रुपये असणारी ही रक्कम थोडी वाटत असली तरी एक नवा पायंडा आम्ही पाडत आहोत असे सांगत धुळप म्हणाले, असे जर सर्वच दहीहंडी आयोजकांनी केले तर एक चांगले समाज उपयोगी कार्य होईल. २७ ऑगस्ट रोजी मुंबईतील दादर मध्ये केशवराव दाते मैदान येथे दहीकाला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



# नाईलाजाने निवडणूक लढवावी लागत आहे

## वळसे पाटलांच्या वक्तव्याने अनेकजण विधानसभेसाठी इच्छुक

**पुणे / रमेश जाधव :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आंबेगाव तालुक्यातील मंचर येथे नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा संपन्न झाली. यावेळी संबोधित करताना राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले माझी कन्या पुर्वा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक नाही. त्यामुळे नाईलाजास्तव मी महायुतीच्या वतीने निवडणूक लढवत आहे . वळसे पाटलांच्या या वक्तव्यांने आंबेगाव विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढली असुन अनेकांना आमदारकीची स्वप्ने पडू लागली आहेत.

गेली ३५ वर्ष राज्याचे सहकार मंत्री तथा आंबेगाव तालुक्याचे आमदार दिलीप वळसे पाटील यांच्याकडे आंबेगाव तालुक्याची एकहाती राजकीय सत्ता आहे. या वेळेच्या विधानसभा निवडणुकीत वळसे पाटील यांची कन्या पूर्व वळसे पाटील विधानसभेची निवडणूक लढवणार अशा चर्चा होत होत्या . मात्र जनसन्मान यात्रेत वळसे पाटील यांनी या सर्व चर्चांना पूर्णविराम देत. माझी मुलगी निवडणूक लढवणार नाही असे सांगत मी स्वतः विधानसभेची निवडणूक नाईलाजास्तव लढवत असल्याचे वक्तव्य केले.

दरम्यान वळसे पाटलांच्या या वक्तव्याचा धागा पकडून शिवसेना शिंदे गटाचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य असलेले सचिन बांगर यांनी आंबेगाव विधानसभेची जागा

**(वार्तापत्र)**

शिवसेनेला (शिंदे गट) द्यावी असा दावा केला त्यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या .बांगर यांनी केलेल्या विधानामुळे तालुक्यात राजकीय क्षेत्रात नवीनच समीकरणे तयार झाली आहेत . त्यातच एक महत्त्वाचे म्हणजे जर तालुक्यात साठ हजार मते शिवसेना शिंदे गटाकडे असल्याचे बांगर यांनी म्हटले आहे . तर मग शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे तालुक्यात काहीच स्थान नाही का ? असा प्रश्न निर्माण झाला असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांतून चर्चेला उधाण आले आहे . शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख सुरेश भोर यांच्यासह काही पदाधिकारी हे देखील शिवसेनेचे उबाठा गटाचे तालुक्यात साठ हजारापेक्षा जास्त मतदान असल्याचे वारंवार अनेक ठिकाणी जाहीर सभांमधून सांगत आहे. त्यामुळे तालुक्यातील शिवसैनिक नक्की कोणत्या गटाकडे आहेत हा खरा प्रश्न आहे निर्माण झाला आहे.

सद्यस्थितीत तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) शिवसेना (उबाठा गट) आणि काँग्रेस पक्ष अशी महाविकास आघाडी असून महाविकास आघाडी कडून विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी देवदत्त निकम यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जात आहे . त्याचबरोबर जिल्हाप्रमुख सुरेश भोर , प्रा.राजाराम बाणखेले यांच्यासह इतरही नावे चर्चेत असून महायुतीच्या वतीने सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांची उमेदवारी मंचरच्या जनसन्मान यात्रेत जाहीर झाली. तसेच महायुतीच्या वतीने शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषदेचे गटनेते देविदास दरेकर हे देखील इच्छुक असल्याचे समजते .

मात्र वळसे पाटलांनी नुकत्याच केलेल्या विधानामुळे महायुतीतील सर्वच पक्षांचे उमेदवार मैदानात आपले नशीब आजमावण्यासाठी उतरण्यासाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. महायुतीच्यावतीने भाजपकडून संजय थोरात यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे.

गेली ३५ वर्षे राज्याचे सहकार मंत्री दिलीप पाटील हे मोठ्या फरकाने आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून विजय होत आहेत . वळसे पाटील यांनी तालुक्याच्या राजकारणात केलेली संघटनात्मक बांधणी मजबूत असून त्यांचा सहजासहजी पराभव होणे दुरापास्थ आहे. परंतु त्यांनी माजी केंद्रीय कृषिमंत्री आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यापासून घेतलेली फारकत आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेली साथ सर्वसामान्य मतदारांना आवडली नाही. त्यामुळे वळसे पाटलांची राजकिय गादी डळमळीत झाल्यासारखी दिसून येते.

तालुक्यात शरद पवार यांच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या जुन्या पिढीच्या कार्यकर्त्यांच्या नाराजीच्या रोशाला वळसे पाटलांना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षात झालेल्या फुटी नंतर शरद पवार यांना भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम यांनी तालुक्यात सक्षम राजकीय साथ दिली . मागील लोकसभा निवडणुकीत निकम यांनी तालुक्यात खासदार डॉ.अमोल कोल्हे यांना आघाडी मिळवून देण्यासाठी जीवाचे रान केले. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत वळसे पाटील यांना निकम हे राजकीय टक्कर देऊ शकतात असे राजकीय जाणकारांचे मत आहे. मात्र सत्तेच्या राजकारणात कोणाचे प्यादे केव्हा वरचढ होईल हे सांगता येत नाही.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या पंखांना बळ'

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरातील कोट्यावधी लखपती दीदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या ध्येयाकडे एक पाऊल म्हणून महाराष्ट्रात २५ लाख लखपती दीदी बनण्याचे कार्य पूर्णत्वास जात आहे.लखपती दीदींचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाखापेक्षा जास्त होण्यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत.अभियानातील महिलांना बँकेचे व्यवहार शिकविले जातात त्यांना आर्थिक साक्षर केले जाते. कृषीविषयक माहितीसाठी अभियानात कृषीसखी आहेतबँकविषयक मदतीसाठी बँक सखी, अशा विविध क्षेत्रात प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्ती अभियानात आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्धीसाठी अनेक राष्ट्रीयीकृत बँकाकडून कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते.उमेद अभियानात २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात एकूण ८ हजार ९७४ कोटी रुपये कर्ज वितरण करण्यात आले असून आज पर्यंतच्या इतिहासातील हे सर्वात मोठे कर्ज म्हणून देखील गणले गेले आहे.ग्रामीण भारतातील गरिबीच्या निर्मूलनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात सन २०११ मध्ये केली.अभियानामध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीम प्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे.यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करुन त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा, तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी उमेद मार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.'उमेद' अभियानाच्या या महिला सक्षमीकरणाच्या चळवळीमध्ये आज महाराष्ट्रातील ३४ जिल्हे ३५१ तालुक्यातील जवळपास ६६ लाख कुटुंब सहभागी आहेत. अभियानात आतापर्यंत ६ लाख ४० हजार महिला स्वयं सहाय्यता समूह स्थापन झालेले आहेत. यातील १ लाख २५ हजारापेक्षा जास्त गट हे मागील दोन वर्षात स्थापन झालेले आहेत. ३१,८१२ ग्रामसंघ, १,८७५ प्रभागसंघ, १० हजार ८३ उत्पादक गट आणि ४१० पेक्षाही जास्त शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झालेल्या आहेत.या संस्थांच्या दैनंदिन सुलभीकरणासाठी गावस्तरावर प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तींची फळी निर्माण करण्यात आलेली आहे. उमेद अभियानामार्फत महिलांनी रोजगार कसा करावा? कोणता करावा.याचे प्रशिक्षण आरसेटी मधून आणि कृषी विज्ञान केंद्र व यासारख्याच विविध तज्ज्ञ संस्थामार्फत प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत प्रशिक्षण कार्यशाळा व प्रशिक्षण वर्ग चालविले जातात.ठडएढख चे प्रत्येक जिल्ह्यात असणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे कौशल्य वाढविण्याचे कार्य अविरतपणे सुरु आहे. राज्यात १३ लाख पेक्षा अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत.व्यवसाय वृद्धीसाठी उमेद अभियानामार्फत विविध प्रकारचे प्रदर्शन स्थानिक पातळीवर भरवून उद्योगांना हक्काची बाजारपेठ तयार करून दिली जाते.तसेच विविधस्तरावर महालक्ष्मी सरस सारखे प्रदर्शन भरवून ग्रामीण महिलांच्या उद्योगांना जागतिक बाजारपेठ निर्माण करून दिली जाते. त्याचप्रमाणे ग्रामीण महिलांची उत्पादने ग्राहकांना आपल्या घरापर्यंत उपलब्ध व्हावीत यासाठी https://umedmart.com/ हे ई- कॉमर्स पोर्टल सुद्धा सुरु करण्यात आले आहे.उमेद अभियानाची ग्रामीण महिलांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची चळवळ आता जोर धरत आहे आणि हे बदल दृश्य स्वरूपात दिसत आहेत. ज्या ग्रामीण भागातील महिला केवळ घर, चूल, मूल यापुरत्या मर्यादित होत्या अशा असंख्य महिला आज अनेक मोठ्या व्यासपीठावर आत्मविश्वासाने आपली मते मांडताना दिसत आहेत.तसेच अनेक महिला या स्वतः च्या पायावर सक्षमपणे उभा राहून गावाच्या आर्थिक विकासात सुद्धा योगदान देताना दिसत आहेत.डोंगराळ भाग असो की अतिदुर्गम भाग अशा प्रत्येक ठिकाणी आज उमेद अभियानाची महिला स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा निर्माण करत आहे.खाद्य पदार्थाची निर्मितीउमेद अभियानाच्या महिला आता मसाले, पापड, लोणचे यांच्यासह अनेक खाद्य पदार्थाची निर्मिती करीत आहेत.याशिवाय हस्तकला, कपडे, शोभेच्या वस्तू, शिल्पकलेच्या वस्तू, खेळणी, मातीची भांडी यासारखे अनेक उत्पादने महिला घेत आहेत. राज्यात आज घडीला ग्रामीण महिलांचे शेती आधारित ३८ लाखापेक्षा जास्त उद्योग व्यवसाय सुरु आहेत आणि बिगर कृषी आधारित सुद्धा ७ लाख ५६ हजार व्यवसाय सुरु आहेत. येणाऱ्या काळात आमच्या ग्रामीण भागातील महिलांचे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक असणार आहेत.प्रत्येक गावातील कुटुंबाचा सर्वांगीण विकास




साधावा त्याचबरोबर दारिद्र्य निर्मुलनासाठी शासन अनेक योजना राबवत आहे.यासाठी ग्रामीण भागाची प्रगती दारिद्र्य निर्मुलानातून झाल्याशिवाय अशक्य असल्याचे लक्षात आल्यामुळेच केंद्रसरकारने देशभर दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण अजिविका मिशन हा ध्वजांकित कार्यक्रम सुरु केलेला आहे.महाराष्ट्रात सुद्धा हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान नावाने राबविला जात आहे. उमेद अभियान नावाने गावागावात या कार्यक्रमाची ओळख आहे. या अभियानाने व्यापक चळवळीचे स्वरूप धारण केलेले आहे.प्रगतीचा आणि स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून, रोजगार अन स्वयं रोजगाराच्या नव्या वाटा शोधून उत्तुंग भरारी घेण्यासाठी ग्रामीण महिला सुद्धा आता सर्व क्षेत्रात अग्रेसर दिसत आहेत. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण महिलांच्या आयुष्यात सुख, समाधान आणि नवचैतन्य असण्यामागचे मुख्य कारण उमेद अभियान बनले आहे.

## मुंबईत ठाकरेंची शिवसेनाच मोठा भाऊ; २० जागांसाठी ठाकरे गटांचा दावा, तर राष्ट्रवादीलाही हव्यात इतक्या जागा

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षच मोठा भाऊ असणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शनिवारी दिली. जागावाटपासंदर्भात अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. पुढील बैठकीत जागावाटपाबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता असल्याची माहिती आव्हाड यांनी यावेळी दिली. शनिवारी पार पडलेल्या या बैठकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मुंबईतील २० जागांवर दावा करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबईतील जागावाटपासंदर्भात शनिवारी मुंबईतील प्रमुख नेत्यांची विशेष बैठक शनिवारी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय राऊत, अनिल देसाई राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जितेंद्र आव्हाड, राखी जाधव मुंबई काँग्रेसकडून वर्षा गायकवाड, भाई जगताप आदी उपस्थित होते. या बैठकीत मुंबईतील सर्व जागांबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे कळते. या बैठकीत बदलापूर घटनेबाबतही चर्चा झाल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

या बैठकीत शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेच महाविकास आघाडीचे येत्या निवडणुकीत नेतृत्व करणार आहेत. प्रचारासाठी ठाकरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. मुंबईत शिवसेनेचे येथे मोठे वर्चस्व आहे. त्यामुळे किमान वीस जागा मिळाव्यात, अशी मागणी पक्षातील नेते मंडळींकडून करण्यात आली आहे. तर नवाब मलिक यांच्या अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघावर तिन्ही पक्षांनी दावा केला असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## नराधमांना फाशी व राज्यकर्त्यांनी राजीनामा द्यावा : सत्यजितसिंह पाटणकर

**पाटण** : बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारासह राज्यात महिला तरुणी व अल्पवयीन मुलींवर वाढलेले अत्याचार व अन्याय या विरोधात शासनाने तातडीने कठोर भूमिका घेत संबंधितांना फाशी व कठोर कारवाया कराव्यात. राज्यातील महिलांवरील अत्याचाराचे हे लोन पाटण तालुक्यातील तारळेपर्यंत पोहोचले आहे. गुन्हेगार प्रवृत्तींच्या कार्यकर्त्यांना प्रशासनावर दबाव टाकून मोकाट सोडले जाते अशा घटनांचा आम्ही तीव्र निषेध करत संबंधित राज्यकर्त्यांनी नैतिकतेची चाड बाळगत राजीनामे द्यावेत अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांनी केली.

बदलापूर घटनेचा निषेध व महिला, तरुणी, अल्पवयीन मुलींवर राज्यात व तालुक्यात वाढलेले अत्याचार याच्या निषेधासाठी पाटण येथे सत्यजितसिंह पाटणकर यांचे नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने महिला, विद्यार्थी,विद्यार्थिनी, नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भर पावसात निषेध मोर्चा काढला होता त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना सत्यजितसिंह पाटणकर पुढे म्हणाले बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर स्थानिक शाळेच्या कर्मचाऱ्याने अतिशय घृणास्पद अत्याचार केला. यासह मागील काही वर्षात राज्यात महिलांवर वाढलेले अत्याचार, अन्याय यासह तरुणी, अल्पवयीन मुलींवर होत असलेले क्रूर अत्याचार या विरोधात समाजामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. अशा नराधमांना फाशीची शिक्षा तर झालीच पाहिजे याशिवाय संबधितांवर कठोरात कठोर कडक कारवायाही झाल्या पाहिजेत. दुर्दैवाने ज्यांच्या हाती राज्याची सत्ता आहे असे राज्यकर्ते या अपप्रवृत्तींच्या विरोधात आवाज उठवण्याऐवजी ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांचाच आवाज बंद करण्याचा प्रयत्न करत आहेत. मध्यंतरी पाटण तालुक्यातील तारळे येथेही एका महिलेवर स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांनी अन्याय, अत्याचार केला. संबंधित महिलेने पोलिसांकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला मात्र तेथेही राजकीय दबाव टाकून कार्यकर्ते गुन्हेगारांना सोयीस्कररित्या यातून बाहेर काढण्यात आले. त्यामुळे देशात, राज्यातच नव्हे तर आता हेच विकृतीचे लोण थेट पाटण विधानसभा मतदारसंघातील महिला, तरुणींपर्यंत पोहोचले आहे. राजकीय सत्तेचा वापर आपल्याच माय माऊलींच्या विरोधात करणाऱ्या अशा अपप्रवृत्तींविरोधात आता सगळ्यांनी एकत्रितपणे येऊन लढण्याचा निश्चय केला आहे. यापुढे आपल्या आई बहिणींकडे कोणीही वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करणार नाही यासाठीच आम्ही हा लढा पुकारला आहे. एका बाजूला यातील दोषी नराधमांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजेच, याशिवाय या दुर्दैवी घटनांना जबाबदार व गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या विद्यमान राज्यकर्ते मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांनी नैतिकतेची चाड बाळगून आपला राजीनामा द्यावा. महिला भगिनी, तरुणी, अल्पवयीन मुलींवर कोणी अन्याय, अत्याचार केला तर तितक्याच ताकतीने आम्ही या विरोधात लढा पुकारून पिडीतांना न्याय मिळवून देऊ असा विश्वासही शेवटी सत्यजितसिंह पाटणकर यांनी व्यक्त केला.

यावेळी शिवसेना उ.बा. ठा. पक्षाचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील, मनसेचे तालुका प्रमुख गोरख नारकर, सुभाषराव पवार,संजय इंगवले, सौ. विद्या म्हासुर्णेकर, सौ. मीनाज मोकाशी, सौ. सोनल फुटाणे, सौ. गायकवाड, सौ. डावखरे, सौ. हादवे आदी मान्यवर पदाधिकारी, महिला, विद्यार्थिनी आदींनी निषेधात्मक विचार व्यक्त केले.

# राज्यातील पोलीस झोपलेल्या अवस्थेत

## सरकार अडचणीत आल्यावर विशिष्ट वकील समोर येताय'; जयंत पाटलांची जोरदार टीका



सांगली २४ ऑगस्ट (पीएसआय)

शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. मात्र या विरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर हायकोर्टात झालेल्या सुनावणीत कोणत्याही राजकीय पक्षाला बंद करण्याची परवानगी नाही. जर तसा कुणी प्रयत्न केला तर कायदेशीर कारवाई करा, असे निर्देश मुंबई हायकोर्टाने सरकारला दिले. यानंतर आज महाविकास आघाडीकडून एक तास निषेध आंदोलन करण्यात आले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी इस्लामपूर मतदारसंघामध्ये सरकारविरोधात निदर्शने केली. बदलापूरमधील घटनेवरून जयंत पाटील यांनी राज्य सरकार आणि पोलीस दलाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीकास्त्र डागले.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात तोंडाला काळ्या फिती बांधून महायुती सरकारच्या विरोधात ही निदर्शने केली गेली. महाविकास आघाडीने पुकारलेला महाराष्ट्र बंद मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरविल्यानंतर हा बंद मागे घेण्याची घोषणा आघाडीकडून रात्री करण्यात आली आहे. बंद मागे घेण्यात आला असला तरी तोंडाला काळ्या फिती बांधून महायुती सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

जयंत पाटील म्हणाले की, सध्या महाराष्ट्रातील पोलीस (इदत्म) झोपलेल्या अवस्थेत आहे. सरकारचे ऐकल्याशिवाय ते काही करत नाहीत. कोणती घटना घडली की, सरकारी पक्षाकडून कुणाचा फोन येतो का? याची पोलीस वाट पाहत आहेत. पण सरकारचे ऐकून देखील काही पोलीस अधिकारी निलंबित होतायत, त्यामुळे पोलिसांनी सरकारचे किती ऐकायचे हे लक्षात ठेवावे, असे त्यांनी म्हटले आहे.

बदलापूर बंदचा नारा देत महाराष्ट्र एकवटायला लागला होता. पण सरकार अडचणीत आल्यावर काही विशिष्ट वकील समोर येतायत ही वस्तुस्थिती आहे. मराठा आरक्षणाबाबत देखील हेच वकील कोर्टात गेले होते, अशी टीका जयंत पाटील यांनी वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यावर केली आहे.

## बदलापूर, शिये सह राज्यात महिला अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचे भर पावसात जोरदार निदर्शने

**कुरुंदवाड** : बदलापूर शिये सह राज्यात महिलांच्यावर दिवसेंदिवस अत्याचाराचे प्रमाण वाढत असल्याच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडीने मारुती चौकात नगरपालिकेसमोर तोंडाला काळ्या फिती बांधून जोरदार निदर्शने केली यावेळी सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली



यावेळी जिल्हा शिवसेनाप्रमुख वैभव उगळे युवा नेते शिरोळ विधानसभा प्रमुख अभिजीत उर्फ बबलू पवार शिवसेना शहरप्रमुख बाबासाहेब दयानंद मालवेकर माजी नगरसेवक राजू आवळे काँग्रेसचे सर्फराज जमादार यांनी बदलापूर तसेच राज्यातील लैंगिक अत्याचार व बलात्कार सारख्या झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करत तीव्र संतप्त भावना व्यक्त केल्या. तसेच शासनाचा नाकर्ते पणावर जोरदार हल्ला चढवला.

यावेळी माजी नगराध्यक्ष दादासो पाटील कुरुंदवाड शहर कृती समिती अध्यक्ष सुनील कुरुंदवाडे मा उपनगराध्यक्ष, दयानंद मालवेकर, आप्पासो भोसले, , शहराध्यक्ष तानाजी आलासे, सर्व पक्षीय कृती समितीचे प्रफुल्ल पाटील, , सुनील कुरुंदवाडे, मिलिंद गोरे, रामभाऊ माळी, रघु नाईक, साहिल शेख कबीर, जय कडाळे, अभिजीत रावसो पाटील, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अभय पाठूकले, सदाशिव सुभेदार, जयपाल बलवान, बंडू चव्हाण, महेंद्र माळगे, राजश्री मालवेकर, राणी कोरे यांच्यासह महाविकास

## नूतन पोलीस भरती झालेल्या ९३ उमेदवारांना नियुक्ती पत्रे प्रदान

**कोल्हापूर** : जिल्ह्याच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०२२-२३ मधील रिक्त असलेल्या १५४ पोलीस शिपाई पदासाठी भरती घेण्यात आली होती. यामध्ये मैदानी व लेखी परीक्षेमध्ये पात्र असलेल्या १४८ उमेदवारांची अंतिम यादी २७ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या निवड यादीतील उमेदवारांची वैद्यकीय चाचणी, चारित्र्य व पूर्व इतिहास पडताळणी, जात प्रमाणपत्र पडताळणी व समांतर आरक्षणाची कागदपत्रे पडताळणी यासाठी संबंधित विभागास पाठवण्यात आली होती. त्या विभागाकडून पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पात्र ९३ उमेदवारांना २३ ऑगस्ट रोजी नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली.

उर्वरित उमेदवारांचे पडताळणे अहवाल प्राप्त झाल्यानंतरच त्यांना नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. चालक पोलीस शिपाई भरती मधील ५९ उमेदवारांचे नियुक्ती आदेश देखील लवकरच देणार असल्याचं पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून सांगण्यात आले

## रंकाळा टॉवर परिसरातील डॉक्टराकडून महिला कर्मचाऱ्यांची छेडछाड; हाणामारीत चौघे जखमी

**कोल्हापूर** - रंकाळा टॉवर परिसरातील सिद्धी हॉस्पिटल या आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये डॉ. अतुल सोमय्या यानं हॉस्पिटल मधील महिला कर्मचाऱ्यांची छेडछाड केली. यावेळी जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिला कर्मचारी आणि डॉक्टर मध्ये हाणामारीचा प्रकार घडलाय. यामध्ये डॉ. अतुल सोमय्या, त्याची पत्नी आणि महिला कर्मचारी असे चौघेजण जखमी झाले असून त्यांना सायंकाळी उपचारासाठी सीपीआर इथं आणण्यात आलं होतं. या प्रकरणी लक्ष्मीपुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचं काम उशिरापर्यंत सुरू होतं.

रंकाळा टॉवर परिसरातील एका अपार्टमेंट मध्ये डॉ. अतुल सोमय्या याचं सिद्धी आयुर्वेदिक हॉस्पिटल आहे. डॉ. सोमय्या हा गेल्या काही महिन्यांपासून इथल्या महिला कर्मचाऱ्यासोबत छेडछाड करत होता. आज दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास त्यानं इथं काम करणाऱ्या एका कर्मचारी महिलेची छेडछाड केली. तिनं याची माहिती आपल्या नातेवाईकांना दिली. तात्काळ महिला कर्मचारी जाब विचारण्यासाठी आली असता डॉ. सोमय्या, त्याची पत्नी आणि कर्मचारी महिला तिची नातेवाईक महिला यांच्यात जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीत कर्मचारी महिला, तिची नातेवाईक महिला, डॉक्टर ची पत्नी जखमी झालेत. दरम्यान, डॉ. सोमय्या हा या हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांशी वारंवार असा प्रकार करत असल्याची तक्रार इथल्या महिला कर्मचाऱ्यांनी माध्यमांशी बोलताना दिली. या घटनेची माहिती मिळताच लक्ष्मीपुरी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती घेवून पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याचं काम रात्री उशिरा पर्यंत सुरू होते.

## निधी पाहिजे असेल तर अजित दादाकडे जावा

### बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण याचा आ.सुमनताईंना अजब सल्ला

**तासगाव** : मी कोणत्याही पदावर नव्हतो तेंव्हा आर आर आबा पाटील यांनी मला भरपूर मदत केली होती त्यामुळे तुम्ही काळजी करु नका, पण तुम्हाला मतदारसंघाच्या विकास कामासाठी निधी पाहिजे असेल तर अजित दादांकडे जावा. असा अजब सल्ला सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या आमदार सुमन आर. आर. पाटील यांना दिला आहे.

या वक्तव्याचा निषेध म्हणून आणि निधीच देणार नसाल तर बैठकीला येऊन कोणत्या कामाचा पाठपुरावा करु असा सवाल आमदार सुमनताई यांनी बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांना लेखी पत्राद्वारे विचारून शुक्रवारी पुणे येथे झालेल्या बैठकीवर बहिष्कार टाकला.

बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी बांधकाम विभागांतर्गत विभागनिहाय क्षेत्र स्तरावरील कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पुणे येथील विश्रामगृहात एक बैठक घेतली आहे. सदर बैठकीस आपण उपस्थित रहावे असे निमंत्रण सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी आमदार सुमनताई यांना लेखी पत्राद्वारे दिले होते.

यानंतर आमदार सुमनताई यांनी मंत्री रविंद्र चव्हाण यांना एक पत्र लिहले आहे. यामध्ये म्हटले आहे, आपण दिनांक २३ ऑगस्ट २४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत कामांची आढावा बैठक बोलविल्याचे निमंत्रण मला मिळाले आहे. त्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे.

वास्तविक डिसेंबर २३ मध्ये नागपूर येथे आलेल्या अधिवेशनात खासदार दर्डा यांच्या कार्यक्रमामध्ये आपली भेट झाली होती. त्यावेळी आपणास विनंती करून निधी द्यावा असं बोलले. यावेळी आपण स्व.आबांचा उल्लेख करून असे सांगितले की, कोणत्याही पदावर नसताना आबांनी मला भरपूर मदत केलेली होती. त्यामुळे आपण काळजी करू नका.

त्यानंतर चार - पाच दिवसानंतर मी आपणास कामांची यादी घेऊन भेटले, परंतू आपण निधी देण्याबाबत असमर्थ आहोत असे सांगून दादांना भेटा तरच निधी मिळेल असे मला सांगितले. पुन्हा मार्च २४ च्या अधिवेशनामध्ये आपणास भेटून कामांची यादी दिलेली होती. तसेच आर आर आबा यांनी आपणास केलेल्या मदतीची आठवण करून दिली व निधी मागितला. तरीही मला निधी देण्यास टाळाटाळ करुन निधी देण्यास अडचणी आहेत असे सांगितले. त्यामुळे पुणे येथील बैठकीत कोणत्या कामांचा पाठपुरावा करावा ? असाच प्रश्न मला पडल्याने आपण पाठवलेले निमंत्रण मी अगत्यपूर्वक स्वीकारते, परंतू बैठकीस अनुपस्थित राहते. आपण निमंत्रण दिल्याबद्दल मी आपली आभारी आहे

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ मविआचे साताऱ्यात आंदोलन

## सरकार असंवेदशील असल्याचा आरोप; गृहविभागाच्या कारभाराबाबत नाराजी

सातारा : राज्यात बदलापूर व अन्य ठिकाणी झालेल्या महिला व बालिका अत्याचार प्रकरणाचा महाविकास आघाडीतर्फे शनिवारी जोरदार निषेध करण्यात आला. सातारा येथील पोवई नाक्यावरील शिवतीर्थावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मूक आंदोलन केले. राज्य सरकार असंवेदनशील असून गृहविभागाच्या कारभाराबाबत यावेळी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



सातारा : बदलापूर अत्याचाराच्या घटनेचा निषेध करताना महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते .

या आंदोलनामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व आंदोलकांनी तोंडाला काळया पट्ट्या बांधल्या होत्या. राज्यातील महायुती सरकारला लैंगिक अत्याचाराच्या घटना रोखण्यात पूर्णपणे अपयश आले असून या सरकारचा जाहीर निषेध अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव म्हणाले, राज्यात घडलेल्या महिला अत्याचार प्रकरणाचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीने साताऱ्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आज आंदोलन केले. राज्यात लहान मुलींवर अत्याचार होत आहेतड़ रोज नवीन प्रकार उघडकीस येत आहेत. राज्याच्या गृह खात्याचे या घटनांवर नियंत्रण राहिलेले नाही.

राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने म्हणाले, राज्यामध्ये महिलांवरील अत्याचारच घटना सातत्याने घडत आहेत. या घटना माणुसकीला काळमा फासणारे आहेत. बदलापूरच्या घटनेमध्ये पालकांनी आवाज उठवल्यानंतर पोलीसच त्यांच्या आवाज दाबत होते. हा प्रकार अतिशय निंदनीय असून सरकारने अशा घटनांमध्ये तरी गांभिर्याने पाहणे गरजेचे आहे.

शिवसेनेचे उपनेते नितीन बानगुडे - पाटील म्हणाले, बदलापूर सोबतच कोल्हापूर, नागपूर, अकोला, पुणे या जिल्ह्यांमध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने घडल्या आहेत. राज्यातील सरकार अशा घटना हाताळताना संवेदनशीलपणा दाखवत नाही. अशा घटनां विरोधात आवाज उठवायचा झाला तर आंदोलनाला परवानगी नाकारली जात आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या वतीने राज्यातील महायुती सरकारचा जाहीर निषेध करण्यात येत आहे.

या आंदोलनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष सचिन मोहिते, काँग्रेसच्या धनश्री महाडिक, नरेश देसाइ, विजय बोबडे यांच्यासह विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

---

# नारी शक्तीचा सन्मान आणि आदर झालाच पाहिजे

## धैर्यशील कदम यांचे प्रतिपादन

**सातारा :** सातारा शहरातील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला साक्षी ठेवून, भारतीय संविधानाच्या साक्षीने, समाजातील सर्व नारीशक्तीचा सन्मान आणि आदर व्हायला पाहिजे , भारतीय संविधान म्हटल्याप्रमाणे ,कोणताही भेदभाव न करता सर्व माता-भगिनी मुली यांना समानतेची वागणूक दिलीच पाहिजे, महिलांच्या बाबतीत अपराध करणाऱ्या नराधमांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी चे जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम यांनी केले . त्यांच्या अध्यक्षतेखाली , नारीशक्तीसाठी समाज जागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम यांनी महिला मुली यांच्याकडे वाईट नजरेने बघणारे डोळे फोडले पाहिजेत ,बदलापूर सारख्या प्रकरणात घृणास्पद कृत्य करणाऱ्या नराधमांना फाशी दिली पाहिजे आणि राज्य सरकार याबाबत नक्कीच कठोर निर्णय करेल असे सांगितले .महिला मोर्चा प्रदेश चिटणीस सुनिशा शहा यांनीही नारी शक्तीला आदरपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे आणि त्यांचा अपमान करणाऱ्या अपराध्यांना कडक शासन झाले पाहिजे असे सांगितले



समाजातील वाईट घटनांबद्दल खेद व्यक्त करून सर्व नारीशक्तीला समान न्याय आणि आदराची वागणूक देण्यासाठी समाजाला जागृत करणारे अभियान राबवताना नारीशक्तीच्या सन्मानाची शपथ यावेळी घेण्यात आली

यावेळी जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम, सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रेणू येळगावकर, प्रदेश चिटणीस सुनिशा शहा, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष चिन्मय कुलकर्णी, अनु जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित भिसे, जिल्हा सरचिटणीस मनीषा पांडे, जिल्हाचिटणीस निशा जाधव, ओबीसी महिला जिल्हाध्यक्ष वनिता पवार, ओबीसी महिला शहराध्यक्ष गौरी गुरव, अनुसूचित जाती मोर्चा महिला शहर अध्यक्ष अंजनी त्रिंबके, सातारा शहर उपाध्यक्ष चित्रा माने, युवती मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सायली धोत्रे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिवनामे, डॉक्टर सचिन भोसले, डॉक्टर सचिन साळुंखे, अप्पा कोरे, नगरसेवक धनंजय जांभळे, नगरसेवक विजय कटवटे,नगरसेवक सुनील काळेकर, यशवर्धन मुथालिक ,निखिल वाघमारे, प्रथमेश मोरे , अक्षय चांगन, चेतन पवार ,अमेय घाड़गे, श्रीकांत साबळे, अजय शेळके, तुषार घोरपड़े, मयूर साबळे, अजित पवार ,सुनील लाड ,राहुल राठोड ,प्रथमेश इनामदार ,हर्षद नलवडे ,विशाल सावंत ,साहिल मोरे ,श्रीधर हदगे ,शुभम नाईक आणि पदाधिकारी उपस्थित होते

---

# विधानसभेसाठी नगरची जागा ठाकरे गटाऐवजी मित्रपक्षाला ?

## इच्छुकांमधील एकमताचा बसणार पक्षाला फटका

**अहमदनगर :** लोकसभेच्या निवडणुकीत अपेक्षित यशानंतर महाविकास आघाडीमध्ये आता राज्यातील आगामी विधानसभा निवडणुका जिंकून राज्यात पुन्हा एकदा महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्याचा दावा मविआचे नेते करु लागले आहेत. लोकसभा निवडणुका पार पाडल्यानंतर लगेचच महाविकास आघाडीतील तीनही पक्षांनी विधानसभेसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. मविआतील घटक पक्षांनी महाराष्ट्रातील विधानसभेच्या सर्वच जागांवर उमेदवारांची चाचपणी करत काही उमेदवारांना तयारी सुरु करण्याची देखील सूचना आल्याचे कळते.

नगर शहर विधानसभा मतदारसंघावर महाविकास आघाडीसह महायुतीच्या सर्वच घटक पक्षांनी दावा ठोकला आहे. सध्या नगर शहर विधानसभेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार आहेत. लोकसभेच्या विजयानंतर महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षातील इच्छुक उमेदवारांनी आपापल्या पक्षातील नेत्यांकडे मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेना ठाकरे गटातील इच्छुकांनी देखील आपल्या वरिष्ठ नेत्यांकडे विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. परंतु विधानसभा लढवणाऱ्या इच्छुकांमध्ये कुठलेही एकमत होताना दिसत नसल्याने शिवसेना ठाकरे गट ही जागा महाविकास (चरहरतळज्ञरी -सहरवळ) आघाडीतील मित्र पक्षाला सोडणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समजते. त्यामुळे या इच्छुकांमूळे नगरची जागा ठाकरे गटाला गमवावी लागणार अशी चिन्हे सध्या तरी दिसत आहे.

नगर शहर विधानसभा मतदारसंघ हा राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण या मतदारसंघावर काँगेस पक्षानंतर शिवसेना वगळता इतर कोणत्याही पक्षाला आपले वर्चस्व राखता आले नाही. नगर शहरातील जनतेने शिवसेनेचे स्व.अनिल राठोड यांना तब्बल २५ वर्ष नगर शहराचे नेतृत्व दिले होते. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वाला राष्ट्रवादी पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांनी सुरुंग लावत २०१४ साली विकासाच्या मुद्द्यावर नगर शहरातून विधानसभेवर निवडून गेले. तर २०१९ च्या निवडणुकीत शिवसेना, भाजपा, काँग्रेस पक्षांच्या अंतर्गत गटबाजीचा फायदा घेत दुसऱ्यांदा संग्राम जगताप हे विधानसभेवर निवडून गेले. परंतु मधल्या काळातील शहराची झालेली अवस्था, शहरात सुरू असलेली गुन्हेगारी, तसेच खुंटलेला विकास या मुद्यांचा फटका विद्यमान आमदारांना बसू शकतो अशी चर्चा सद्या नगरकरांमध्ये सुरु आहे. त्यामुळे नगर शहर विधानसभेच्या जागेवर पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाने दावा केला आहे.

**नगरची शिवसेना स्व. राठोड यांच्यानंतर नेतृत्वहीन?**

दरम्यान शिवसेनेचे उपनेते स्वर्गीय अनिल राठोड यांच्या निधनानंतर नगर शहरात शिवसेनेला व शिवसैनिकांना कोणीही वाली राहिला नसल्याची भावना आजही निष्ठावंत शिवसैनिकांकडून दबक्या आवाजात बोलली जाते. स्व. राठोड यांच्यानंतर पक्षातील अंतर्गत सुप्त गटबाजी सातत्याने सुरुच असून यामध्ये आता विधानसभेच्या इच्छुकांची भर पडली आहे. त्यामुळे सध्या तरी पक्षाचे मूळ कार्यक्रम सोडता पक्षातील इच्छुक आगामी विधानसभा निवडणुकीसाठी स्वतःचा चेहरा जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सध्या कार्यकर्त्यांनी तुका म्हणे उगी रहावेजे जे होईल ते ते पहावे अशीच भूमिका घेतल्याचे पहायला मिळते.

**विधानसभेसाठी शिवसेना ठाकरे गटातील इच्छुकांमध्ये होईना एकमत!**

दरम्यान नगर शहर विधानसभेची जागा ही पारंपारिक शिवसेनेची असल्याचे सांगत नगरमधील शिवसैनिकांनी महाविकास आघाडीकडे ही जागा शिवसेनेला सोडण्यात यावी असा अशी आग्रही भूमिका घेतली होती. परंतु ठाकरे गटामध्येच अनेक जण इच्छुक असून या इच्छुकांमध्ये कुठलेही एकमत होताना दिसत नाहीये. प्रत्येक इच्छुक माझेच तिकीट फायनल झाल्याचे सांगत असून नगर शहर विधानसभेसाठी शिवसेना ठाकरे गटाकडून 'मीच उमेदवार' असणार असा देखील प्रचार या इच्छुकांनी नगर शहरात सुरू केला आहे. पक्षाला बंडखोरीला सामोरे जावे लागू नये म्हणून ही जागा शिवसेना ठाकरे गटाऐवजी महाविकास आघाडीतील इतर मित्र पक्षांना सोडली जाणार असल्याचे माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समजते.

**नगरच्या जागेवर राष्ट्रवादी शरद पवार गटासह काँग्रेसचा दावा!**

शिवसेना ठाकरे गटातील इच्छुकांमध्ये एकमत होत नसल्याचे पाहून महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट तसेच काँग्रेसने या जागेवर दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार निलेश लंके हे विजयी झाल्यानंतर शहरातील पदाधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठ नेत्यांकडे नगर शहर विधानसभेची जागा राष्ट्रवादी शरद पवार गटाला मिळावी अशी आग्रही मागणी केल्याचे समजते तसेच या जागेवर काँग्रेसने (उेपसीर्शी) देखील दावा केला असून काँग्रेसमधील इच्छुकांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात तसेच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले (छरपर झर्रोश्रश) यांच्याकडे मोर्चेबांधणी देखील सुरु केल्याचे समजते. परंतु सध्या तरी महाविकास आघाडीतील या दोन्हीही पक्षाकडे प्रबळ दावेदार दिसत नाही

---

# साखर कारखानदारी आणि ऊस उत्पादन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी संस्थांनी काम करावे : राधाकृष्ण विखे पाटील

**पुणे :** साखर कारखानदारी आणि ऊस उत्पादन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणण्याचे आव्हान असून त्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी संशोधन आणि तंत्रज्ञान विकास करण्यासाठी काम करावे, असे आवाहन राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

जे. डब्लू. मेरीयट हॉटेल येथे आयोजित दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस् असोसिएशनच्या (डीएसटीए) ६९ व्या वार्षिक अधिवेशन आणि प्रदर्शनाच्या उद्धाटन प्रसंगी दूरदृष्य प्रणालीद्वारे ते बोलत होते. यावेळी आमदार अरुण लाड, साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे (एनएफसीएफएस) अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, एनएफसीएफएसचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे, डीएसटीएचे अध्यक्ष एस. बी. भड, उपाध्यक्ष (तांत्रिक) एस. डी. बोखारे आदी उपस्थित होते.

ऊसाच्या उत्पादकतेत वाढ करणे, राज्यातील ऊस उत्पादन वाढविणे आदी आव्हाने आपल्यापुढे असल्याचे सांगून मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, साखर कारखानदारी आणि सहकारी चळवळीचे नाते अभिन्न आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या उद्योगाने राज्याच्या ग्रामीण



अर्थव्यवस्थेला स्थैर्य दिले. सहकार चळवळीने देशाच्या अर्थव्यवस्थेमध्येही मोठा वाटा बजावला आहे. साखर कारखानदारीच्या वाटचालीत गेल्या काळात डीएसटीएची महत्त्वाची भूमिका राहिली आहे, असेही ते म्हणाले.

ज्या भागात ऊस उत्पादन अधिक आहे. त्या भागातील आर्थिक विकासाचे चित्र अधिक चांगले असल्याचे आपल्याला पाहायला मिळते. सर्वसामान्य शेतकऱ्यांची चूल पेटवण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी काम केले. सहकारी साखर कारखानदारीची वाटचाल चांगली असल्याचे समाधान आहे, असे त्यांनी सांगितले.

श्री. विखे पाटील पुढे म्हणाले, देशाच्या इतिहासात पहिल्यांदा केंद्र शासनाने सहकार मंत्रालयाची स्थापना केली. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला साखर कारखान्यांचा आयकराचा प्रश्न सहकार मंत्रालयाने मार्गी लावला. इथेनॉल निर्मितीच्या माध्यमातून अधिक उत्पन्नाचा मार्ग दाखविला. या सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील नवीन सहकारी साखर कारखाने, खासगी कारखाने यांच्यापुढील आव्हानांवर मार्ग शोधला जात आहे. आज केंद्र शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हमी भाव देण्याबाबत निर्णय घेतला. ऊसापासून उपपदार्थ निर्मितीला चालना दिली.

ऊस उत्पादनखर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उत्पादनात वाढ करणे आदी नवीन आव्हाने आहेत.

आज केवळ साखर उत्पादनावर अवलंबून राहण्यासारखी परिस्थिती नाही. ज्यूस, सिरप, मळीपासून इथेनॉल निर्मितीच्या उत्पादनाचे क्षेत्र पुढे आले आहे त्याचा साखर कारखान्यांनी फायदा घेतला पाहिजे. केंद्र शासनाच्या धोरणांतर्गत पेट्रोलमध्ये २५ टक्के इथेनॉल मिसळण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे ऊसशेती, साखर उत्पादन, तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे, असे प्रतिपादनही त्यांनी केले. कारखान्यांच्या आधुनिकीकरणासाठी तंत्रज्ञान विकसित करणे, ऊस तोडणीचा खर्च मोठा असून अजूनही परदेशातून हार्वेस्टर आयात करावे लागतात. त्यामुळे या सर्व बाबींमध्ये संशोधन करुन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज असून त्यावर काम करावे, असेही ते म्हणाले.

---

# लायन्स क्लब ऑफ पुना निगडीच्यावतीने मनिषा गायकवाड अध्यक्षपदी निवड



**पिंपरी चिंचवड :** लायन्स क्लब ऑफ पुना निगडीचा पदग्रहण सोहळा १० ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. सौ मनिषा गायकवाड यांची अधक्ष्यपदी निवड झाली. इन्स्टॉलिंग ऑफिसर लायन राज मुछाल यांच्या हस्ते शपथविधी सोहळा पार पडला.

रीजन चेअरप बसर्सन शैलजा सांगळे, झोन चेअरपर्सन मीनांजली मोहिते, माजी नगरसेवक व स्टँडिंग कमिटी चेअरपर्सन सीमाताई सावळे, सारंग कामथेकर, कॅबिनेट सचिव रवींद्र गोलार, कॅबिनेट खजिनदार विजय जाजू , लायन्स इंटरनेशनलचे इतर पदाधिकारी पल्लवी देशमुख, अनिल झोपे, वसंत भाऊ कोकणे, इ. सदस्यांची उपस्थिती होती.

पती श्री. प्रमोद गायकवाड, कुटुंबीय, मित्रपरिवार, निगडी क्लबचे सर्व सदस्य व इतर क्लबचे अधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

---

# बदलापूर प्रकरणातील गुन्हेगारांना कठोरातील कठारे शिक्षा व्हावी

## कराडात महाविकास आघाडीकडून मूक आंदोलन करीत निषेध : तहसीलदारांना निवेदन

**कराड :** बदलापूरच्या चिमुकल्यांवरील अत्याचार आणि महाराष्ट्रात महिलांवर वाढत चाललेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ गुन्हेगारीला प्रवृत्त करणाऱ्या आणि गुन्हेगारांची पाठराखण करणाऱ्या महायुती सरकारच्या विरोधात कराड शहरात मूक आंदोलन करून निषेध करण्यात आला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बंद मागे घेत आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला. तरीसुद्धा आज महाविकास आघाडीच्या दिग्गज नेत्यांनी महाराष्ट्रभर सरकारविरोधात निषेध आंदोलन केलं. या अनुषंगाने आज कराड मध्ये सुद्धा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस उदयसिंह पाटील यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडी मधील कराड तालुक्यातील नेत्यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या



स्मारकाजवळ एकत्र येऊन तोंडावर काळ्या फीत लावून आंदोलन केले.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टी आणि महाविकास आघाडीच्यावतीने, राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री आमदार बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली कराड शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर, कराड तालुका व कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये तोंडाला काळ्या फिती बांधून मूक आंदोलन करून घटनेचा निषेध नोंदवण्यात आला, गुन्हेगारांना तातडीने कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष शिवराज मोरे, कराड दक्षिण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मनोहर शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख नितीन काशीद, काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष झाकीर पठाण, शिवसेना कराड शहर उपाध्यक्ष शेखर बर्गे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अनिता जाधव, कराड दक्षिण महिला काँग्रेस अध्यक्षा विद्याताई थोरवडे, मलकापूर माजी नगराध्यक्षा नीलम येडगे, गीतांजली थोरात, कराड दक्षिण युवक काँग्रेस अध्यक्ष दिग्विजय पाटील कराडचे माजी नगरसेवक अशोकराव पाटील, प्रदीप जाधव, मलकापूरचे माजी नगराध्यक्ष मोहनराव शिंगाडे, दिग्विजय सूर्यवंशी, यासह कराड उत्तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष देवराजदादा पाटील, मानसिंगराव जगदाळे, कांतीलाल पाटील, जयंत पाटील, ॲड.विद्याराणी साळुंखे, उमा हिंगमिरे, नंदकुमार बटाणे, सौरभ पाटील, प्रशांत यादव, अख्तर आंबेकरी, प्रताप पाटील, हंबीरराव जाधव, सोमनाथ जाधव, सुधीर जाधव, प्रमोद पुजारी, सुधाकर जाधव, जयंत जाधव, माणिकराव पाटील, डी.बी.जाधव, बबनराव भोजगांवकर, प्रकाश पाटील, जयंत बेडेकर, गंगाधर जाधव, भास्करराव गोरे, पै.संजय थोरात, लालासाहेब पाटील, रामदास पवार, बजरंग पवार, मंगेश पाटील, संजय कुंभार, उद्धवराव फाळके, रामचंद्र पाटील, शंकरराव खापे, सुहास पवार, शिवाजी पवार, सचिन पाटील, जयवंत थोरात, प्रणव ताटे, भरत थोरवडे, शोएब सुतार, निखिल शिंदे, सिद्धार्थ चव्हाण, भिमराव ढमाले, मोहम्मद आवटे, नेताजी चव्हाण, ॲड. अशोक पवार, चिमणराव कदम, संजय कदम, बाळासाहेब सुर्यवंशी, वसंतराव कणसे, दिपक कटारिया, अधिक सुर्वे, अशोकराव संकपाळ, मिलिंद पाटील, तानाजीराव जाधव, दत्तात्रय चव्हाण, संदीप गायकवाड, धनाजी जाधव, अनिल चव्हाण, हर्षद वाघमारे यांच्यासह महाविकास आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्ते, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे आजी-माजी संचालक, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आजी-माजी सदस्य, कराड नगरपरिषदेचे आजी-माजी नगरसेवक तसेच पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कराड तालुका व कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील विविध गावाहून आलेले ज्येष्ठ नागरिक तरुण कार्यकर्ते महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.